**निशाणी क्र.५ व ४३ वरील एकत्रित आदेश (नि.दि.दा.क्र.१०४/२०१२)**

वादी यांनी प्रस्तुतचे अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ३९ नियम १ प्रमाणे मौजे वरोशी, ता.जावली, जि.सातारा येथील स.नं.२७/६ चे वादीचे मालकीचे आठ आणे हिश्याच्या वहिवाटीस प्रतिवादी क्र.१ याने स्वतः अगर इतरांमार्फत हरकत करू नये, पिक काढून नेऊ नये व प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी खरेदीदस्ताचे आधारे स.न.१/२, २६/११, ३५/९ व ५२/३ या मिळकतींमध्ये वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीस अडथळा करू नये तसेच उर्वरीत वादमिळकती स.नं.२७/३, ३१/२, ३१/३, ५२/८ व ५९/१८ प्रतिवादी नं.२ ने कोणत्याही प्रकारे तबदील करू नयेत म्हणून तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेले आहेत. (येथून पुढे सोईसाठी सदर मिळकतींस वादमिळकती असे संबोधण्यात येत आहे.)

वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे असे आहे की,

२. वादमिळकती हया वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्या वडिलार्जित एकत्र कुटुंबाच्या समाईक मालकी वहिवाटीच्या आहेत. प्रतिवादी नं.२ चा वादमिळकतीमध्ये प्रत्यक्ष कब्जा नव्हता व नाही. वादी व प्रतिवादी नं.२ यांचेमध्ये वादमिळकतींचे वाटप झालेले नाही. प्रतिवादी नं.२ हा दारूच्या व्यसनाच्या आहारी गेल्याने त्याने वादमिळकतीचा पोकळ दस्त प्रतिवादी नं.१ चे नावे केल्याचे समजताच वादी नं.१ दि.८.१०.२०१२ दै.लोकमत या वर्तमानपत्रातून कळवले होते. दि.१६.१०.२०१२ रोजी प्रतिवादी नं.१ ने वादीशी भांडण करून पीक काढून नेणार अशी धमकी दिली. तसेच प्रतिवादी नं.२ ने मौजे वरोशी, ता.जावली येथील मिळकत अ.नं.१, २, ७ व ८ या मिळकतींची विक्री प्रतिवादी नं.३ ला केली व मौजे रेंगडेवाडी येथील अ.नं.१ ची मिळकत

प्रतिवादी क्र.४ यांना विक्री केली. प्रतिवादी नं.१ व २ यांचेविरूध्द दि.२३.१०.२०१२ रोजी एकतर्फा ताकीद दिलेली असतानाही दि.३१.१२.२०१२ रोजी त्यांनी प्रतिवादी नं.३ ला वादमिळकतींची विक्री केली तसेच मिळकत नं.१५/१३ या मिळकतीचा विक्रीचा व्यवहार प्रतिवादी क्र.४ बरोबर बेकायदेशीरपणे केला. सबब प्रतिवादी नं.१, ३ व ४ यांनी वादमिळकतीतील वादींचे मालकी हक्क कब्जे वहिवाटीस हरकत करू नये, तसेच प्रतिवादी क्र.२ ने वादमिळकत अन्य इसमांना तबदील करू नये म्हणून दाव्याचे निकालापावेतो तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेविषयी विनंती केली.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी अनुक्रमे नि.५८ व नि.६० ला म्हणणे देऊन अर्जास प्रखर विरोध केला आहे. वादीने संपूर्ण मिळकती वादपत्रात समाविष्ट केलेल्या नाहीत. प्रतिवादी नं.२ हा वादमिळकतीचा ८ आणे हिश्याने मालक झाला आहे. वादमिळकत प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.२ कडून नोंदणीकृत खरेदीदस्ताने खरेदी केलेली आहे. प्रतिवादी नं.२ जरी भिलार, ता.महाबळेश्वर येथे राहत असला तरी तो वरचेवर वरोशी येथे येऊन शेतजमिनी प्रत्यक्ष वहिवाटून उत्पन्न घेत होता. प्रतिवादी नं.२ ला दारूचे व्यसन नाही. वादमिळकतीत प्रतिवादी नं.२ ची सन १९८९ नंतर स्वतंत्रपणे ८ आणे क्षेत्रात मालकीहक्काने कब्जेवहिवाट होती व आहे व त्याने त्याला मिळालेल्या हिश्याची व कब्जातील जमिनीची विक्री केली आहे. सबब तुर्तातूर्त मनाई अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती केली. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी हजर होऊनही अर्जास म्हणणे न दिलेने अर्ज विनाम्हणणे चालविणेत आले.

४. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण होतात, त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेतः-

| <u>मुद्दे</u> | | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. वादी सकृतदर्शनी केस शाबीत करतो काय ? | .. | होय. |
| २. न्यायाचे समतोलत्व कोणाच्या बाजूने आहे ? | .. | वादींच्या. |
| ३. मनाईचा अर्ज नामंजूर झाल्यास कोणाचे अपरिमित नुकसान होणार आहे? | .. | वादींचे. |
| ४. आदेश काय ? | .. | अर्ज मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करीताः**–

५. वादीतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी नं.२ वादमिळकत अन्य इसमांना तबदील करण्याच्या प्रयत्नात आहेत. वादी व प्रतिवादी क्र.२ हे सख्खे भाऊ असून त्यांचेमध्ये वादमिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.२ ने मिळकत प्रतिवादी क्र.३ व ४ यांना तबदील केलेली आहे. प्रतिवादी क्र.३ व ४ हे त्रयस्थ इसम असल्याने त्यांनी वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीस अडथळा करू नये म्हणून दाव्याचे निकालापावेतो तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेविषयी विनंती केली. त्याकरिता त्यांनी खालील न्यायनिवाडयांचा आधार घेतला.

> *"M.V.S. Manikayala Rao v/s. Narasimhaswami and others, AIR 1966 Supreme Court 470"*, यामध्ये असे अभीक्षण केले आहे की,
>
> But the alienee is entitled to obtain possession of that part of the family property which might fall to the share of his alinor at a partition. What the alienee acquires by a purchase is not any interest in specific family property but only an equity to enforce his right in a suit of partition and have the property alienated set apart for the alienor's share, if possible.

मी वरील न्यायनिवाडयाचे अवलोकन केले. उपरोक्त न्यायनिवाडयातील हकीकत व बाबी हातातील प्रकरणाशी मिळत्याजुळत्या असल्याने त्यातील न्यायतत्वे हातातील प्रकरणास लागू होतात असे माझे मत झाले आहे.

६. प्रतिवादी क्र.२ तर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, वादी व प्रतिवादी क्र.२ चे एकत्र कुटुंब असल्याचा अंदाज या स्थितीत काढता येणार नाही. प्रतिवादी क्र.३ व ४ यांची वादमिळकतीत कब्जेवहिवाट आहे व प्रतिवादी क्र.२ ने त्याचा हिस्सा प्रतिवादी क्र.१ ला विकलेला आहे. वादीने फेरफार नं.१०३१ सन १९८२ पासून आव्हानित केलेला नाही. सबब अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती केली. त्याकरिता त्यांनी खालील न्यायनिवाडयाचा आधार घेतला.

> *"Marabasappa (D) by L.Rs. & Ors. Vs. Ningappa (D) by L.Rs. & Ors., 2011(6) ALL MR Supreme Court 428"* यामध्ये असे अभीक्षण केले आहे की,
>
> There is no presumption of a joint Hindu family but on the evidence if it is established that the property was joint Hindu family and the other properties were acquired out of that nucleus, if the initial burden is discharged by the person who claims joint Hindu family, then the burden shifts to the party alleging self-acquisition to establish affirmatively that property was acquired without the aid of the joint family property by cogent and necessary evidence.

मी वरील न्यायनिवाडयाचे अवलोकन केले. उपरोक्त न्यायनिवाडयातील न्यायतत्वांचा सन्मान ठेवून त्यातील हकीकत व बाबी हातातील प्रकरणाशी मिळत्याजुळत्या नसल्याने त्यातील न्यायतत्वे हातातील प्रकरणास लागू होत नाहीत असे माझे मत झाले आहे.

७. वादी यांनी नि.७ ते १७ ला दाखल केलेल्या ७/१२ उता–यांचे अवलोकन केले असता, वादी व प्रतिवादी क्र.२ यांची समाईकात १६ आणे क्षेत्रात कब्जेवहिवाट असल्याचे दिसून येते. नि.क्र.१८ सोबत दाखल केलेल्या फेरफार नं.१०३१ चे अवलोकन करता, विठ्ठल कासुर्डे मयत असून त्यांना बाजीराव कासुर्डे व तुकाराम कासुर्डे व मुलींची वारस म्हणून नोंद असल्याचे दिसून येते. तुकाराम कासुर्डे यांनी सुनील कासुर्डे यांना लिहून दिलेले खरेदीखत, पोलीस स्टेशनला दिलेला तक्रारी अर्ज तसेच लता कासुर्डे, शिवराम कासुर्डे, पांडुरंग कासुर्डे, बाबुराव ओंबाळे या साक्षीदारांची वादींची वादमिळकतीत कब्जेवहिवाट असलेबाबत शपथपत्रे दाखल केली आहेत. प्रतिवादी नं.१, ३ व ४ हे त्रयस्थ इसम असल्याने त्यांना वाटपाचा दावा दाखल करून त्यांची स्वतंत्र कब्जेवहिवाट सिध्द करून घेतल्याशिवाय त्यांना वादी व प्रतिवादी क्र.१ सोबत समाईक वहिवाट करण्याचा हक्क नाही. सबब वादी यांनी सकृतदर्शनी केस शाबीत केलेली आहे. सबब मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दे क्रमांक २ व ३ करीताः**–

८. वादी यांनी सकृतदर्शनी केस शाबीत केली आहे. न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे. प्रतिवादी क्र.१, ३ व ४ हे त्रयस्थ इसम असल्याने त्यांना वादी तसेच प्रतिवादी क्र.२ यांचेसोबत वाटपाचा दावा दाखल करून त्यांची स्वतंत्र कब्जेवहिवाट सिध्द करून घेतल्याशिवाय वादी व प्रतिवादी क्र.२ सोबत समाईक वहिवाट करण्याचा हक्क नाही. सबब प्रतिवादी यांना तूर्तातूर्त हुकूमाने मनाई हुकूमाने प्रतिबंधीत न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे व तूर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. सबब मी मुद्दे क्रमांक २ व ३ चे निष्कर्ष वादींचे हक्कात नोंदवत

आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करीताः</u>**

९. वादींनी सकृतदर्शनी केस सिध्द केल्याने न्यायाचे समतोलत्व त्यांचे बाजूने राहते व प्रतिवादी यांना तूर्तातूर्त मनाई हुकूमाआधारे प्रतिबंधीत न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल. सबब वादी तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेस पात्र आहेत. अर्जातील कारणांचा विचार करता वादी हे प्रतिवादींकडून अर्जाचा खर्च मिळणेस पात्र आहेत. सबब मुद्दा क्रमांक ४ चे उत्तराकरीता मी खालील आदेश करीत आहेः–

**<u>आदेश</u>**

१) प्रतिवादी क्र.२ अगर तर्फे इसमांनी तबदील न झालेल्या वादमिळकती अन्य कोणासही तबदील करू नयेत अगर त्यावर बोजा निर्माण करू नये म्हणून त्यांना दाव्याच्या अंतिम निकालापावेतो तुर्तातूर्त मनाई हुकूम करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.१, ३ व ४ अगर तर्फे इसमांनी वादमिळकतीत वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत करू नये म्हणून प्रतिवादी नं.१, ३ व ४ यांना दाव्याच्या अंतिम निकालापावेतो तुर्तातूर्त मनाई हुकूम करण्यात येतो.

३) प्रतिवादींनी वादीस अर्जाचा खर्च देण्याचा आहे.

( **स.गौ.कोरे** ),

दिनांकः ३०.०१.२०१४ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मेढा